"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"
दुरध्वनी क्रमांक - 0253-2572730
ई-मेल - dycfwestnashik@yahoo.com
dycfnashikwest@mahaforest.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन,वन विभाग.
उप वनसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक यांचे कार्यालय.
उंटवाडी वन वसाहत आवार, संभाजी चौक, नाशिक 422002

पत्र जा.क्र.कक्ष-३/जमिन/ 278 / सन २०२५-२६ दिनांक 21 /०६/२०२५.

प्रति,
**मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

**विषय:-** वनजमिन-ठाणे व नाशिक
मे.जेएसडब्लयू एनर्जी पीसएसी लि.मुंबई यांना भावली पंप स्टोरेज प्रोजेक्टचे बांदकाम करण्यासाठी ठाणे व नाशिक जिल्हयातील २४३.७४ हे.वनजमीन वळतीकरणाबाबत

**संदर्भ**:-१) मा.अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी ,महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/एफसीए-S१/पीआयडी-१५३२४०/२५-२६/५४३ दि.५.६.२०२५
२) मे.जे.एस.डब्लयू एनर्जी,पीएसपी-२/मुंबई यांचेकडील पत्र क्र.जेएसडब्लयू/जीएसपी-भावली/साईट/२५-२६/०२२ दि.२०.६.२०२५

विषयांकीत प्रस्ताव प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये उपस्थित करण्यांत आलेल्या पशिचम भाग नाशिक वनविभागाशी संबधीत मुदयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहेत.

१) **मुद्दा क्र.०१** : वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे जामुंडे ता.इगतपुरी जि.नाशिक येथील गट क्र.४२ च्या इतर अधिकार अभिलेखावर खाजगी व्यक्तींची नावे दिसून येतात.
: - मौजे जामुंडे ता.इगतपुरी जि.नाशिक येथील गट क्र.४२ मुद्याच्या अनुषंगाने मे.जे.एस.डब्लयू एनर्जी,पीएसपी-२/मुंबई यांनी सादर केलेले आहे की, खाजगी व्यक्ती यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यांची कार्यवाही प्रस्तावाच्या अंतिम मंजुरी पुर्वी करण्यांत येईल. तसेच खाजगी व्यक्ती यांना महाराष्ट्र शासनाच्या व केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व नियमानुसार नुकसान भरपाई देण्यांत येईल असे हमीपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे.(प्रत सहपत्रीत)

२) **मुद्दा क्र.०७** : नाशिक वन विभागामध्ये केद्रस्थ अधिकारी व उपवनसंरक्षक,पशिचम नाशिक यांनी ६२३५ इतक्या वृक्षांची तोड होणार असल्याचे नमुद केले आहे.परंतु ऑनलाईन पार्ट-२ मध्ये नाशिक विभागामध्ये ६४०४ वृक्ष असल्याचे नमुद केले आहे.प्रकल्पामध्ये नेमकी किती वृक्षतोड होणार आहे,याची खातरजमा करून,त्यानुसार सुधारीत कागदपत्र सादर करावीत.

: - प्रस्तावित प्रस्तावांत पश्चिम भाग नाशिक वनविभागा अंतर्गत बाधीत होणा-या वनक्षेत्रांत एकुण ६२३५ वृक्षांची तोड होणार असून तशी सुधारीत माहिती ऑनलाईन पार्ट-२ करण्यांत येऊन सुधारीत पार्ट-२ ची सुधारीत प्रत सादर करण्यांत येत आहे.

तरी प्रस्ताव प्रकरणी आवश्यक कार्यवाही आपलेस्तरावरून व्हावी ही,विनंती.

सोबत- वरील प्रमाणे

(सिध्देश सावर्डेकर)

**उपवनसंरक्षक**

**पश्चिम भाग, नाशिक**

**प्रत-** मा.अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी ,महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत- मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वनविभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत- उपवनसंरक्षक शहापूर वनविभाग ,शहापूर यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रत- मे.जे.एस.डब्लयू एनर्जी,पीएसपी-२/मुंबई याना संदर्भीय पत्र क्र.२ च्या अनुषंगाने माहितीस्तव